**“महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” योजनेंतर्गत परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.३५/का.१४२५-अ**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२३.

वाचा :-

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.सारथी-२०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३.

२) व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे, यांचे पत्र क्र.: सारथी/परदेश शिष्य./९०८/२०२३, दिनांक ०३.१०.२०२३.

प्रस्तावना :-

“महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती” योजना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका आणि पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी अनुक्रमे ५० व २५ याप्रमाणे एकूण ७५ लाभार्थ्यांची निवड करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेची कार्यपध्दती व निवड प्रक्रीया ही संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२०.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता सारथी संस्थेमार्फत वर्तमानपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्दी देवून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सारथी संस्थेकडे विहित कालमर्यादेपर्यंत ऑनलाईन पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन छाननी समितीने पात्रतेच्या अटी/शर्ती तपासून विद्यार्थ्यांची यादी समितीच्या शिफारशीसह निवड समितीपुढे निर्णयार्थ सादर केली. प्रधान सचिव, (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीची दि २०.१०.२०२३ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरीता- (२५), पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमाकरीता- (५०) अशा एकूण - (७५) जागा उपलब्ध आहेत. त्यानुषंगाने प्राप्त अर्ज विचारात घेवून सन २०२३-२४ या वर्षामध्ये परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता शिष्यवृत्ती साठी खालील विद्यार्थ्यांच्या निवड यादीस मान्यता देण्यात येत आहे.

**अ) पी.एच.डी (Ph.D.) अभ्यासक्रम:**

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव (QS Ranking) |
|---|---|---|---|
| | | I) अभियांत्रिकी (उपलब्ध जागा - ०५) | |
| १ | प्रिती सिद्रया शिंदे (महिला) | CHEMICAL ENGINEERING | Sungkyunkwan University (SKKU), (९९), Sourth Koria |
| | | II) विज्ञान (उपलब्ध जागा - ०५) | |
| २ | पल्लवी अरुण मोहनापुरे (महिला) | AGRICULTURAL SCIENCE | Ghent Univesity (१४३), Belgium |
| ३ | प्रथमेश आनंदराव पाटील | MATERIALS SCIENCE | Technische Universitat Wien (१७९), Austria |

**ब) पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रम:**

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव (QS Ranking) |
|---|---|---|---|
| | | I) अभियांत्रिकी (उपलब्ध जागा - २०) | |
| १ | मनिष मारुती कदम | M.S. COMMUNICATIONS ENGINEERING | Technical University of Munich (४९), Germany |
| २ | निकिता प्रभाकर जरे (महिला) | M.S. COMPUTER SCIENCE | Columbia University (२२), U.S.A. |
| ३ | योगीता राजू पाटील (महिला) | M.S. AEROSPACE ENGINEERING | University of Michigan-Ann Arbor (२५), U.S.A. |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव (QS Ranking) |
|---|---|---|---|
| ४ | अथर्व सुनिल बिरादार | M.S. ELECTRICAL AND COMPUTER ENGINEERING | University of California, San Diego (USCD) (५३), U.S.A. |
| ५ | अनिरुध्द नरेश शिंगटे | M. S. ENGINEERING MANAGEMENT | Johns Hopkins University (२४), U.S.A. |
| ६ | आशिष किशोर ठाकरे | M.S. STRUCTURAL ENGINEERING | University of Leeds (८६), U.K. |
| ७ | विजय अविनाश वारे | M.S. CIVIL ENGINEERING | Politecnico di Milano, (१३९), Italy |
| ८ | यश अशोक नवघरे | M.Sc. CYBER SECURITY | University of Birmingham, (९१), UK |
| ९ | कौस्तुभ दिलीप खोडके | MASTER IN MECHANICAL ENGINEERING | Delft University of Technolgy (६१), Netherlands |
| १० | गौरव नरेंद्र पाटील | M.S. COMPUTER SCIENCE | Western University (१७२), U.K. |
| ११ | राहुल संजय औताडे | MASTERS IN ROBOTICS | University of Minnesota Twin Cities (१८५), U.S.A. |
| १२ | सिध्दार्थ शिरीष काकडे | MASTER IN COMPUTER SCIENCE | University of Florida (१८८), U.S.A. |
| १३ | सतीश आबासाहेब गायकवाड | M.S. COMPUTER SCIENCE | University College Dublin (१८१), Ireland |
| | II) व्यवस्थापन (उपलब्ध जागा -०२) | | |
| १४ | आर्चीस सुभाष टाकळकर | MANAGEMENT (MSC 1YFT) | Imperial College London (७), U.K. |
| १५ | वेद अमित साळवी | M.S. IN BUSINESS AND FINANCE | The University of Warwick (६४), U.K. |
| | III) विज्ञान (उपलब्ध जागा - १०) | | |
| १६ | रितप्रभा केदार सूर्यवंशी (महिला) | M.Sc. INFORMATION SCIENCE | University of Texas at Austin (७२), U.S.A. |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव (QS Ranking) |
|---|---|---|---|
| | | **IV) विधि (उपलब्ध जागा - ०४)** | |
| १७ | शिवराज मनोज आखरे | LLM INTERNATIONAL COMMERCIAL LAW | University of Birmingham, (९१), U.K. |
| १८ | क्षितिज अशोक देवखिले | LLM FT LAWS | Queen Mary University of London (१२५), U.K. |

२. वरील नमूद केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना खालील अटींच्या अधीन राहून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे.:-

I. सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांचे पालन करण्यात यावे.

II. ही शिष्यवृत्ती **गृह चौकशीच्या अधीन राहून** मंजूर करण्यात आली असून गृह चौकशीमध्ये विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा अर्ज दाखल करताना चूकीची माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

III. कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्तव्यात कसूर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची रक्कम १५ टक्के चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल, अशा विद्यार्थ्याचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच, प्रचलित कायद्यानुसार त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामिनदार आणि संदर्भ अधिकारी / व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

IV. ही शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या विद्यार्थ्याने नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. सारथी-२०२३/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३ या शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याबाबतचे बंधपत्र / हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

३. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या शिष्यवृत्तीच्या रकमेची अचूक परिगणना करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे, यांची असेल. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांनी नियोजन विभाग शासन निर्णय क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.२८९/का.१४२५-अ, दि.२०.०७.२०२३ या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन शिष्यवृत्तीच्या रकमेची परिगणना करावयाची आहे. शासन निर्णयात नमूद कोणत्याही अटी/ शर्तीची पूर्तता होत नसल्यास ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येऊ नये.

४. सदरचा खर्च हा खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक- ओ-२

२२२५ अनुसूचित जाती- अनुसूचित जमाती, इतर मागस वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण

०३ मागासवर्गीयांचे कल्याण

१०२ आर्थिक विकास

०१ मराठा, कुणबी, कुणबी- मराठा, मराठा-कुणबी यांचे कल्याण

(०१) (०१) छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था, (सारथी) (कार्यक्रम)

(दत्तमत) (२२२५ F ५२१)

३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

५. वरील खर्चासाठी व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी असलेले लेखाधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन अदा करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३११०६१०४०२८८८१६ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS DNYANOBA LAD

Digitally signed by VILAS DNYANOBA LAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=e5ad43a1d1271b9f27d66550f26003fda8a6ee4b6d27fe708aec6ad5d24e8511, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A2939F426B7A0C7B7ADCBDB9EF405DFECD0B88D1E94A1818DAF4B9F1D6ACEC4B, cn=VILAS DNYANOBA LAD
Date: 2023.11.06 15:04:02 +05'30'

**( विलास लाड )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री, (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५. मा.उपमुख्यमंत्री, (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१०. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
११. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास/ आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
१९. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२०. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२१. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२२. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२३. महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२६. उप सचिव (१४२५-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. अवर सचिव (१४२५-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. प्रधान सचिव, नियोजन यांचे स्वीय सहायक
२९. निवडनस्ती/१४२५-अ.